① समास - सम् + अस - अर्थ एकत्र करणे

घटक :-

① समास व विग्रह म्हणजे काय
② समासाचे प्रकार
③ समासाबद्दल विशेष माहिती

① समास व विग्रह म्हणजे काय

शब्दाच्या एकत्रीकरणास <u>समास</u> असे म्हणतात.

उदा :- बटाटे घालून तयार केलेला वडा - बटाटेवडा
चंद्राचा उदय - चंद्रोदय

+ सामासीक शब्द

दोन स्वतंत्र अर्थ असणारे वेगळे शब्द परस्परसंबंधामुळे एकत्र येऊन जो एक जोड शब्द बनतो (त्याला) <u>सामासिक शब्द</u> असे म्हणतात.

उदा. आई-वडील

+ विग्रह

सामासीक शब्दाची फोड करून दाखवण्याच्या पद्धतीला विग्रह असे म्हणतात. (विग्रहाच्या वेळी विभक्ती प्रत्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय लिहली जातात)

उदा. वनभोजन - सामासीक शब्द
वनातील भोजन - विग्रह

② समासाचे प्रकार

ⓐ अव्ययीभाव समास - पहिले पद +, दुसरे पद -
ⓑ तत्पुरुष समास - पहिले पद -, दुसरे पद +
ⓒ द्वंद्व समास - पहिले पद +, दुसरे पद +
ⓓ बहुव्रीही समास - तिसरेच अन्य पद मुख्य (- - +)

+ मुख्य पद - क्रियापदाला लागून
+ गौण पद - क्रियापदा व्यतरीक्त

# समास

## अव्ययीभाव समास
1. संस्कृत अव्ययीभाव समास
2. यावना (फारसी) अव्ययीभाव समास
3. मराठी अव्ययीभाव समास

## द्वंद्व समास
1. इतरेतर द्वंद्व समास
2. वैकल्पिक द्वंद्व समास
3. समाहार द्वंद्व समास

## तत्पुरुष समास
1. विभक्ती तत्पुरुष समास
2. अलुक् तत्पुरुष समास
3. उपपद तत्पुरुष समास
4. नञ तत्पुरुष समास
5. कर्मधारय तत्पुरुष समास
6. द्विगु तत्पुरुष समास
7. मध्यमपदलोपी तत्पुरुष समास

## बहुव्रीहि समास
1. विभक्ती बहुव्रीहि समास
2. नञ बहुव्रीहि समास
3. सहबहुव्रीहि समास
4. प्रादिबहुव्रीहि समास

### 1. अव्ययीभावी समास
ज्या समासातील पहिले पद महत्त्वाचे असते तसेच त्यांचा वापर क्रियाविशेषण अव्यय असाखा केला जातो त्याला अव्ययीभाव समास असे म्हणतात.

या समासातील शब्द काल, स्थल, रीतीवाचक असतात.

### 2. ~~संस्कृ~~ संस्कृत अव्ययीभाव समास (आ, यथा, प्रति, वि) उपसर्ग
(आ – पासून, यथा – प्रमाणे, प्रति – प्रत्येक)

| सामासिक शब्द | विग्रह | --- वाचक (क्रियाविशेषण अव्यय) |
|---|---|---|
| आजन्म | जन्मापासून | कालवाचक |
| आकर्ण | कानापासून | स्थलवाचक |
| यथाक्रम | क्रमाप्रमाणे | रीतिवाचक |
| यथाशक्ती | शक्तीप्रमाणे | रीतिवाचक |
| प्रतिदिन | प्रत्येक दिवशी | कालवाचक |
| प्रतिक्षण | प्रत्येक क्षण | कालवाचक |
| व्यर्थ | अर्थाशिवाय | रीतिवाचक |

② फारसी (फारशी) अव्ययीभाव समास ( दर, हर, बर, बिन, बे, बेका, गैर )
प्रत्येक प्रत्येक प्रमाणे

| सामासीक शब्द | विग्रह | ... वाचक |
|---|---|---|
| दररोज | प्रत्येक दिवशी | कालवाचक |
| हरघडी | प्रत्येक वेळेला | कालवाचक |
| गैरहजर | हजर नसलेला | रितीवाचक |
| बरहुकूम | हुकूमाप्रमाणे | रितीवाचक |
| बिनशर्त | शर्तीशिवाय | रितीवाचक |
| बेमालूम | माहितीशिवाय | रितीवाचक |
| बेलाशक | शंकेशिवाय | रितीवाचक |

③ मराठी अव्ययीभाव समास
मराठी शब्दाची पुनरावृत्ती होऊन तयार झालेले सामासीक शब्द क्रियाविशेषणाचे कार्य करीत असल्यास ते मराठी अव्ययीभाव समासाचे उदाहरण होतात

| सामासीक शब्द | विग्रह | --- वाचक |
|---|---|---|
| दिवसेंदिवस | प्रत्येक दिवस | कालवाचक |
| गावोगाव | प्रत्येक गाव | स्थलवाचक |
| पावलोपावली | प्रत्येक पाऊल | स्थलवाचक |
| पानोपानी | प्रत्येक पान | स्थलवाचक |
| रस्तोरस्ती | प्रत्येक रस्ता | स्थलवाचक |
| शहरोशहरी | प्रत्येक शहरी | स्थलवाचक |
| दारोदार | प्रत्येक दारी | स्थलवाचक |
| घरोघर | प्रत्येक घरी | स्थलवाचक |
| जागोजाग | प्रत्येक जागी | स्थलवाचक |

+ टिप - मराठी शब्दाची पुनरावृत्ती होऊन तयार झालेल्या सामासिक शब्दातील पहिले पद सामान्यत: ओकारांत असते.

+ टिप - क्रियापदाला केव्हाही प्रश्न विचारल्यास उत्तर कालवाचक येते.
क्रियापदाला कोठेही प्रश्न विचारल्यास उत्तर स्थलवाचक येते
क्रियापदाला कसेही प्रश्न विचारल्यास उत्तर रितिवाचक येते.

② तत्पुरुष समास

ज्या समासातील दुसरे पद महत्त्वाचे असते व अर्थाच्या दृष्टीने गाळलेला शब्द विभक्ती प्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा : तोंडपाठ : तोंडाने पाठ
कुंवरपट्टा कुंवरेसाठी पट्टा

वरील उदा. अनुक्रमे पाठ, पट्टा या दुसऱ्या शब्दांना महत्त्व असून विग्रह करताना ने हा विभक्ती प्रत्यय 'साठी' हे शब्दयोगी अव्यय पुन्हा लिहिलेले आहे.

ⓐ विभक्ती तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासात कोणत्याही विभक्तीचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा ~~उपयोग~~ लोप करून दोन्ही पदे जोडली जातात. त्यास विभक्ती तत्पुरुष समास असे म्हणतात.

| सामासीक शब्द | विग्रह | समासाचे नाव | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| दुःखप्राप्त | दुःखाला प्राप्त | द्वितीया तत्पुरुष | कृष्णाश्रित, देशगत |
| भक्तिवश | भक्तीने वश | तृतीया विभक्ती | तोंडपाठ, दयार्द्र, गुणहीन, उपासमार, ईश्वरनिर्मित, बुद्धिजड |
| क्रीडांगण | क्रीडेसाठी अंगण | चतुर्थी तत्पुरुष | गायरान, पोळपाट, वाटखर्च, मेंढवाडा, पूजाद्रव्य, बाइलवेडा |
| ऋणमुक्त | ऋणातून मुक्त | पंचमी तत्पुरुष | सेवानिवृत्त, गर्भश्रीमंत, जातिभ्रष्ट, रोगमुक्त |
| राजपुत्र | राजाचा पुत्र | षष्ठी तत्पुरुष | चोरभय, जन्मखोड, देवपूजा, राजवाडा, घोडदौड, लक्ष्मीकांत |
| घरजावई | घरातील जावई | सप्तमी तत्पुरुष | स्वर्गवास, पोटशूळ, वनभोजन, कूपमंडूक, घरधंदा, कलाकुशल |

(b) अलुक तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासात पूर्वपदाच्या 'ई' या विभक्ती प्रत्ययाचा लोप होत नाही त्यास अलुक तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा :- अग्रेसर, दीनानाथ, तोंडीलावणे - मराठी भाषेतील उदाहरण

(c) उपपद तत्पुरुष समास (कृदन्त तत्पुरुष समास) - धातू साधित म्हणतात

ज्या तत्पुरुष समासातील दुसरे पद धातुसाधित किंवा कृदन्त असते तसेच त्यांचा वाक्यामध्ये स्वतंत्रपणे वापर करता येत नाही त्यास उपपद तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा. जलद . जल देणारे

पंकज - चिखलात जन्मलेले

शेतकरी . शेती करणारा

द्विज - दोनदा जन्मणारा.

इतर उदाहरणे - ग्रंथकार, कुंभकार, पांथस्थ, मार्गस्थ, द्विज, विहग, देशस्थ, मनुज, सुखद, पयोद, खग, नग, सुज्ञ, कृतघ्न

मराठी उदा. कामकरी, आगलाव्या, भाजीविक्या, वाटसरू

(d) नञ तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद न, ना, नी, अ, अन, बे, गैर असे नकार दर्शक असते त्याला नञ तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदा - अपुरा, नास्तिक, अयोग्य, अनादर, नापसंत, अनाचार, अन्याय, अहिंसा, निरोगी, नाईलाज, नाइभेद, बेडर, गैरहजर

(e) कर्मधारय तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत म्हणजेच प्रथमा विभक्तीत असतात तसेच त्यांच्यातील संबंध विशेषण नाम असतो तेव्हा त्यास कर्मधारय समास असे म्हणतात.

उदा - रक्तचंदन - रक्तासारखे चंदन

महादेव - महान असा देव

महाराष्ट्र - महान असे राष्ट्र

घनशाम - घनासारखा शाम

मुखकमल - कमळासारखा मुख

(i) विशेषण पूर्वपद

उदा - रक्तचंदन, नीलकमल, पीतांबर, महादेव, तांबडीमाती

(ii) विशेषण - उत्तरपद

उदा - घननील, पुरूषोत्तम, भाषांतर, वेषांतर

(iii) विशेषण - उभयपद

उदा - पांढराशुभ्र, श्यामसुंदर, लालभडक, हिरवगार, काळाभोर

(iv) उपमान पूर्वपद

उदा - कमलनयन, मेघशाम, चंद्रमुख

(v) उपमान उत्तर पद

उदा - मुखचंद्र, चरणकमल, नरसिंह

(vi) रूपक उभय पद

उदा - विद्याधन, काव्यामृत, भवसागर, चरणकमल

(F) द्विगू समास

ज्या कर्मधारय समासातील पहीले पद संख्याविशेषण असते तसेच सामासीक शब्दातून एक समुह सुचीत केला जातो त्याला द्विगू समास किंवा संख्यापूर्वपद कर्मधारय समास असे म्हणतात.

उदा - पंचवटी - पाच वडांचा समुह
पांचुंदा - पाच पेंड्यांचा समुह
नवरात्रा - नऊ रात्रींचा समुह
चर्तुमास - चार महिन्यांचा समुह
त्रिभुवन - तीन भुवनांचा समुह
बारभाई - बारा भाईंचा समुह
सप्ताह - सात दिवसांचा समुह
त्रिदल - तीन दलांचा समुह
पंचपाळे - पाच पाळ्यांचा समुह
पंचारती, चौघडी

(9) मध्यमपदलोपी समास

ज्या सामासिक शब्दातील पहिल्या पदाच्या दुसऱ्या पदाशी संबंध दाखवीणारी मधली काही पदे लोप करावी लागतात त्या समासाला मध्यमपदलोपी समास किंवा लुप्तपद कर्मधारय समास असे म्हणतात.

- या समासाचा विग्रह करताना (युक्त, द्वारा, पुरता, असलेला) यासारखे शब्द वापरून स्पष्टता करावी लागते.

उदा. कांदेपोहे - कांदे घालून तयार केलेले पोहे
साखरभात - साखर घालून केलेला भात
दुधभात - दूध घालून केलेला भात
चुलतसासरा - नवऱ्याचा चुलता या नात्याने सासरा
डाळवांगे - वांगेयुक्त डाळ
पुरणपोळी - पुरण भरून तयार केलेली पोळी
भोजनभाऊ - भोजनापुरता भाऊ
घोडेस्वार - घोडा असलेला स्वार
मावसभाऊ - मावशीचा मुलगा या नात्याने भाऊ

इतर उदा. बालमित्र, गुळांबा, बटाटेभात, बटाटेवडा, नातसून, लंगोटीमित्र

③ द्वंद्व समास (दोन्ही पदे प्रधान)

ज्या समासातील दोन्ही पदे अर्थ दृष्ट्या प्रधान म्हणजेच समान दर्जाची असतात त्यास द्वंद्व समास असे म्हणतात.
या समासाचा विग्रह करताना आणि, व, तसेच, वा, अथवा किंवा यासारख्या उभयान्वयी अव्ययाचा उपयोग होतो.

उदा. आईवडील - आई आणि वडील

ⓐ इतरेतर द्वंद्व समास

ज्या समासाचा विग्रह करताना 'आणि' 'व' या समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययाचा उपयोग करावा लागतो, त्यास इतरेतर द्वंद्व समास असे म्हणतात.

उदा. आईबाप, रामलक्ष्मण, विटीदांडू } आणि
भिमार्जुन, हरिहर, स्त्रीपुरुष, अहिनकुल } आणि

बहिणभाऊ, एकवीस, मायलेकरे, कृष्णविष्णू, कुलुपकिल्ली } आणि

ⓑ वैकल्पिक द्वंद्व समास

ज्या समासाचा विग्रह करताना किंवा, अथवा, वा, या विकल्प दाखवणाऱ्या उभयान्वयी अव्ययाचा उपयोग करावा लागतो त्यास वैकल्पिक द्वंद्व समास असे म्हणतात.
+ यात दोन्ही पदे विरुद्ध अर्थाची असतात.

उदा. खरेखोटे, तीनचार, बरेवाईट, पापपुण्य, पासनापास } किंवा

धर्माधर्म, न्यायान्याय, सत्यासत्य } किंवा

(७) समाहार द्वंद्व समास

ज्या समासातील पदाचा विग्रह करताना त्यातील पदाच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचाही त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो त्यास समाहार द्वंद्व समास असे म्हणतात.

उदा. मीठभाकर, चहापाणी, भाजीपाला, अंथरूणपांघरूण, बाजारहाट, पालापाचोळा, केरकचरा, कपडालत्ता

(८) बहुव्रीही समास (विशेष अन्य पद प्रधान)

बहु म्हणजे पुष्कळ व्रीही म्हणजे धान्य बहुव्रीही म्हणजे पुष्कळ आहे धान्य ज्याच्याजवळ असा तो शेतकरी या तिसऱ्या पदाचा बोध होतो म्हणून बहुव्रीही समासाची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

ज्या सामासीक शब्दातील दोन्ही पदांना महत्त्व नसून त्या पदावरून सुचीत होणाऱ्या तिसऱ्याच पदाला महत्त्व असते तसेच हा सामासीक शब्द तीसऱ्या पदाचे विशेषण असते त्याला बहुव्रीही समास असे म्हणतात.

उदा. नीलकंठ - नील आहे कंठ ज्याचा असा तो - शंकर

पीतांबर - पिवळे आहे वस्त्र ज्याचा असा तो - विष्णू

(९) विभक्ती बहुव्रीही समास

ज्या बहुव्रीही समासाचा विग्रह केल्यानंतर शेवटी एकसंबंधी सर्वनाम येवून त्याला विभक्तीचे प्रत्यय लागतात त्यालाच विभक्ती बहुव्रीही समास म्हणतात.

उदा - गजानन - गजाचे आहे आनन ज्या ला असा तो

ज्या - संबंधी सर्वनाम; ला - विभक्ती प्रत्यय

+ विभक्ती बहुव्रीही समासात वेगवेगळे प्रत्यय लागतात यावरून विभक्ती बहुव्रीहीचे पुढील प्रकार पडतात.

+ पदाला लागणाऱ्या प्रत्ययावरून विभक्ती बहुव्रीही समासाचे २ प्रकार पडतात.

ⓘ समानाधिकरण विभक्ती बहुव्रीही

यातील सामासीक शब्दाला विग्रह केल्यानंतर दोन्ही पदे एकाच विभक्तीत असतात तेव्हा त्यांना समाधिकरण विभक्ती बहुव्रीही असे म्हणतात.

उदा. भक्तप्रिय - भक्त (प्रथमा) आहे प्रिय (प्रथमा) ज्याला तो (देव)

जितेंद्रिय - जित (जिंकलेली) (प्रथमा) आहेत इंद्रिये (प्रथमा) ज्याने तो (मारुती)

(ii) व्याधिकरण विभक्ती बहुव्रीही

ज्या बहुव्रीही समासाचा विग्रह करताना यातील दोन्ही पदे वेगवेगळ्या विभक्तीत असतात त्यास व्याधिकरण बहुव्रीही असे म्हणतात.

उदा. चक्र (प्रथमा) आहे पाणित (सप्तमी) (म्हणजेच हातात) ज्याच्या तो (विष्णू)

पद्म (प्रथमा) आहे नाभित (सप्तमी) (म्हणजेच बेंबीत) ज्याच्या तो (विष्णू)

ⓑ नञ् बहुव्रीही समास

ज्या बहुव्रीहि समासातील पहिले पद अ. अन्. न. नि असे नकारदर्शक असेल तर त्यास नञ बहुव्रीही समास म्हणतात

उदा. अनंत . नाही अंत ज्याला तो (परमेश्वर)

नीरस - नाही रस ज्यात ते (काव्य)

अपार . नाही पार ज्याला तो

अथांगत . नाही थांग ज्याला तो

अभंग . नाही भंग पावत जे ते

अहिंसा - नाही हिंसा ज्यात तो

इतर उदा - अव्यय, अनेक, नपुंसक, अनाथी, निर्धन, निशब्द

निरोगी

| प्रकार | सामासिक शब्द | विग्रह | इतर उदाहरणे |
| --- | --- | --- | --- |
| द्वितीया | प्राप्तधन | प्राप्त आहे धन ज्यास तो | प्राप्तोदक, लब्धदृष्टी |
| तृतीया | कृतकार्य | कृत (केले) आहे कार्य ज्याने तो | जितेंद्रिय, कृतकृत्य, दत्तधन |
| चतुर्थी | चौकोन | चार आहेत कोन ज्याला तो | दशमुख, गजानन, दुतोंडा |
| पंचमी | निर्धन | निर्गत (गेले) आहे ज्याच्यापासून तो | निर्बल, गलितपर्ण, गतवैभव |
| षष्ठी | लंबोदर | लंब (मोठे) उदर आहे ज्याचा तो | चक्रपाणि, चंद्रशेखर, मूषकवाहन, गरुडध्वज |
| सप्तमी | भीमादी | भीम आदी आहे ज्यांत तो (पांडव) | कृपादी, नाक [नाही अक (दुःख) ज्यात तो म्हणजे स्वर्ग], पूर्णजल |

ⓒ सहबहुव्रीही समास

ज्या बहुव्रीही समासातील पहीले पद स। सह असे असते त्याला सहबहुव्रीही समास असे म्हणतात. तसेच त्याचा अर्थ (दुसऱ्या पदासहीत असा) होतो

उदा. सादर - आदराने सहीत असा जो (नमस्कार)
सहकुटुंब - कुटुंबाने सहीत असा जो (गृहस्थ)
साष्टांग - अष्ट अंगासहीत आहे असा जो (गणपती)
सधवा - धवा सहीत आहे जी ती (गृहणी)
पति शब्दाचा समानार्थी
सानंद - आनंदासहीत आहे जो तो (बाळ)
~~सचयन~~
सचैल - कपड्यासहीत आहे जो तो
सनाथ - नाथासहीत आहे जो तो
सांब - अंबेसहीत आहे असा जो तो (महादेव)
पार्वती

सहपरिवार, सुपुत्र, सफल, सरूप, सुवर्ण, सबल इ.

ⓓ प्रादिबहुव्रीही समास

ज्या बहुव्रीही समासाच्या प्रथम पदी प्र, परा, अप, सु, वि, दुर या सारखे उपसर्ग येतात त्याला प्रादिबहुव्रीही समास म्हणतात.

उदा - प्रबल - अधिक बलवान आहे असा जो तो — प्र म्हणजे विशेष
सुलोचना - जिचे डोळे चांगले आहे ती — सु म्हणजे चांगले
विधवा - पतीशिवाय आहे जी ती
सुविचार - चांगला आहे विचार ज्यात ते
विज्ञान - विशेष ज्ञान आहे ज्यात असे ते
दुर्गुणी - गुणापासून दूर गेला आहे असा जो तो

प्राज्ञ - विशेष ज्ञानी आहे असे जे

अपवाद - निर्धन - प्रादिबहुव्रीही समास

+ समास विषयक महत्त्वाच्या बाबी

① एकाच सामासीक शब्दाचा वेगवेगळा विग्रह करून प्रकार ठरवता येतो
उदा - असत्य - नाही सत्य ते or सत्य नसलेला - (नञ् तत्पुरुष)
नाही सत्य ज्यात असे जे (नञ् बहुव्रीही)

② तत्सम शब्द असतील तरच संधी करावी
उदा. विद्या + अभ्यास = विद्याभ्यास

टिप - मराठीत शब्दांचा संधी करण्याकडे कल असतो

③ भिन्न भाषातील समास टाळावा
उदा - हेडशिक्षक , डाकगृह , गृहगावई स्कूलगाडी

④ सामासिक शब्दांचे लिंग व वचन शेवटच्या शब्दावरून ठरवितात व विभक्तीचे प्रत्यय शेवटच्या शब्दाला लावतात.

साखरभात (पुल्लिंग) भावसबहिणी (अनेकवचन)
पुरणपोळी (स्त्रीलिंग) मामेभावाचा (षष्ठी विभक्ती)
डाळवांगे (नपुंसकलिंग)

⑤
(i) द्वंद्व व तत्पुरुष समास असलेले शब्द नामे किंवा सर्वनाम असतात.
(ii) अव्ययीभाव समास असलेला शब्द क्रियाविशेषण असतो.
(iii) बहुव्रीही समास असलेला शब्द विशेषण असतो.

② वाक्यविचार

+ घटक - ५

① वाक्याचे विभाग / वाक्यपृथक्करण
② वाक्यांचे प्रकार
③ वाक्यसंकलन
④ वाक्यपरिवर्तन

+ वाक्य म्हणजे काय ?

अर्थपूर्ण शब्दसमुहाला वाक्य म्हणतात.
पूर्ण अर्थाचे बोलणे म्हणजे वाक्य होय

+ वाक्यामध्ये कर्ता (उद्देश्य) क्रियापद (विधेय) हे महत्त्वाचे घटक असतात म्हणून यांना प्रथमोपस्थित संघटक म्हणतात.

① वाक्याचे विभाग

पृथक म्हणजे वेगळे होय. तर वाक्य पृथक्करण म्हणजे वाक्यातील घटक वेगवेगळे करणे त्यांचा एकमेकांशी असणारा संबंध विषद करणे होय. वाक्य पृथक्करणालाच वाक्याचे विभाग असे म्हणतात.

वाक्याचे विभाग

- उद्देश्य विभाग
  - ① उद्देश्य
  - ② उद्देश्य विस्तार
- विधेय विभाग
  - ① कर्म व कर्म विस्तार
  - ② विधानपुरक
  - ③ विधेय विस्तार
  - ④ विधेय

① उद्देश्य विभाग

① उद्देश्य -

+ ज्याच्या विषयी आपण बोलतो त्याला उद्देश्य असे म्हणतात.
+ उद्देशाला कर्ता असेही म्हणतात.
+ क्रियापदाने क्रिया दाखवलेली करणारा जो कोणी असतो त्याला कर्ता म्हणतात
+ कर्ता शोधताना धातुला णारा प्रत्यय लावून कोण असा प्रश्न करावा

टिप - षष्टी चा प्रत्येय (चा, ची, चे, च्या, आ, ऑ, ए, ऱ्या) शब्द शकयतो वाक्याचा कर्ता किंवा कर्म नसतात तर त्यापुढील षष्टी नंतर येणारे शब्द बद्दल कर्ता किंवा कर्म असतात.

उदा. माझा पोपट बोलतो.
रामाचा कुत्रा मेला
काळाला बाळ आले.

② उद्देश्य विस्तार

+ उद्देशाविषयी म्हणजे कर्ता बद्दल माहिती सांगणाऱ्या शब्दांना उद्देश विस्तार म्हणतात.
+ उद्देश विस्ताराला उद्देशविस्तारक असेही म्हणतात.
+ ही कर्त्याची आदि विशेषणे असतात.

उदा. त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला.
त्याचा धाकटा - उद्देश विस्तार
मुलगा - उद्देश्य

ⓑ विधेय विभाग

① कर्म, कर्म विस्तार

ⓘ कर्म

+ क्रिया ज्यावर घडते त्याला कर्म असे म्हणतात
+ कर्म शोधताना क्रिया कोणावर घडते असा प्रश्न केल्यास उत्तर कर्म मिळते.
+ कर्म असणाऱ्या शब्दावर कर्त्याची प्रत्येक्ष क्रिया घडते.
+ कर्माला कर्म पुरक असेही म्हणतात. कारण कर्म-सुद्धा पुरकाचाच एक प्रकार आहे.

टीप - कर्त्याला ने प्रत्येय लावून वाक्य भूतकाळी करावे. आल्यास वाक्य सकर्मक नाही आल्यास वाक्य अकर्मक समजावे.

उदा- पक्षी मासा पकडतो (सकर्मक)
मासा - कर्म

कर्णमाला जोरात पळते (अकर्मक)

सम्यने स्वराचा पतंग कापला
पतंग - कर्म

गवळ्याने म्हशीची धार काढली
कर्म

रामने झाडाचा पेरू तोडला.
कर्म

(ii) कर्म विस्तार

+ कर्माविषयी माहिती सांगणारे शब्द कर्मापुर्वी आल्यास त्याला कर्म विस्तार असे म्हणतात.
+ कर्मविस्ताराला कर्मपुरकाचा विस्तार असे म्हणतात.
+ कर्माची आदि विशेषणे कर्मपुरकाच्या विस्ताराचे कार्य करतात

उदा. काळ्या म्हशीची
झाडाचा } कर्म विस्तार ← वरच्या उदाहरणावरुण

(2) विधान पुरक

कर्त्यानंतर येवून कर्त्याबद्दल अधिक माहिती सांगणाऱ्या शब्दास विधानपूरक असे म्हणतात.

टीप - वाक्याचा कर्ता व कर्त्यानंतर येणारा नाम दोघेही एकाच व्यक्ती किंवा वस्तूला दर्शवित असतील तर ते विधानपूरक असते.

उदा. लता शिक्षिका आहे.

काही वेळेस विधानपूरक कर्त्याच्या अगोदरही येत असते तेव्हा त्याची विभक्ती चतुर्थी असते

उदा. कर्णमालाला बटाटे आवडतात.
मला मोदक आवडतात.

+ आधारपूरक

+ क्रियेला आधार देणाऱ्या घटकांना (शब्दांना आधारपूरक म्हणतात.
+ वाक्यातील स्थलवाचक क्रियाविशेषण आधारपूरकाचे कार्य करते.

उदा. सूर्य डोंगरा आड आला
मेशन लातूरला गेला.

(3) विधेय विस्तार

+ क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगणाऱ्या शब्दांना विधेय विस्तार म्हणतात.
+ क्रियापदाला केव्हा, कोठे, कसे, किती वेळा, किती प्रमाणात असे प्रश्न विचारल्यास येणारे उत्तर विधेय विस्तार असते.

+ वाक्यातील क्रियाविशेषण विधेय विस्ताराचे कार्य करतात.

उदा - काल सकाळी शेजारच्या बागेतील हौदात आमचा काळू धडकून पडला.

केव्हा - काल सकाळी
कोठे - हौदात
कसे - धडकून

④ विधेय -

+ वाक्य पृथक्करणात क्रियापदाला विधेय / मूळ विधेय असे म्हणतात.
+ वाक्याचा अर्थपूर्ण करणाऱ्या क्रियावाचक शब्दाला क्रियापद म्हणजेच मूळ विधेय असे म्हणतात.

उदा - मंदिराचा दरवाजा उघडला.
ती सुंदर दिसते
शरदच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो.
लातूरचा गवळी रोज सकाळी गोठ्यात काळ्या म्हशीचा धार चळाचळा काढतो.

+ वाक्याचे विभाग (02)

| उद्देश विभाग (02) | | विधेय विभाग (05) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| उद्देश विस्तार | उद्देश्य | कर्मविस्तार | कर्म | विधानपूरक / आधारपूरक | विधेय विस्तार | विधेय |
| - | ती | - | - | सुंदर | - | दिसते |
| त्याचा धाकटा | मुलगा | - | - | - | आज सामन्यात चांगला | खेळला |
| शरदच्या चांदण्यात | गुलमोहर | - | - | मोहक | - | दिसतो |
| लातूरचा | गवळी | काळ्या म्हशीची | धार | | रोज सकाळी गोठ्यात चळाचळ | काढतो |

(8) वाक्याचे प्रकार

वाक्याचे प्रकार

अर्थावरुन वाक्याचे प्रकार (5)
- विधानार्थी वाक्य
- प्रश्नार्थी वाक्य
- उद्गारार्थी वाक्य
- होकारार्थी वाक्य
- नकारार्थी वाक्य

विधानाच्या संख्येवरुन प्रकार (3)
- केवल वाक्य
- संयुक्त वाक्य
- मिश्र वाक्य

(1) अर्थावरुन वाक्य

(a) विधानार्थी वाक्य

ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते त्या वाक्यास विधानार्थी वाक्य असे म्हणतात.
कोणतेही माहिती सांगणारे वाक्य विधानार्थी असते अशा वाक्याची सुरुवात कर्ताने होते व शेवट पूर्णविरामाने होते

उदा - बाबा पंढरपूरला गेले.
मी B.A. द्वितीय वर्षाच्या वर्गात शिकतो.
रवी सोयाबीन कापतो.

(b) प्रश्नार्थी वाक्य

ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो त्याला प्रश्नार्थी वाक्य म्हणतात.
या वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह येते.

उदा. तू मुंबईस केव्हा जाणार आहेस ?
तू कोणते पुस्तक वाचतोस

③ उद्गारार्थी वाक्य

ज्या वाक्यात भावनेचा उद्गार काढलेला असतो. त्यास उद्गारार्थी वाक्य असे म्हणतात.

या वाक्याच्या शेवटी किंवा उद्गार दर्शक शब्दानंतर उद्गार चिन्ह येते.

उदा. अबब ! केवढी प्रचंड आग ही.
छी ! किती घाणेरडे तुझे अक्षर

④ करणारुपी वाक्य

ज्या वाक्यात होकार दर्शविला असतो त्याला करणारुपी वाक्य किंवा होकारार्थी वाक्य असे म्हणतात.

उदा. रवी अभ्यास करतो.
मेराज लाडू खातो.

⑤ नकारारुपी वाक्य

ज्या वाक्यात नकार दर्शविला असतो त्याला नकारुपी किंवा नकारदर्शक वाक्य म्हणतात.

उदा. त्याचा मुलगा मुळीच अभ्यास करत नाही
वडिलांशी जास्त वेळ बोलू नये.

② विधानाच्या संख्येवरुन

① केवळ वाक्य

ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते त्यास केवळ वाक्य किंवा शुद्ध वाक्य असे म्हणतात.
हे केवळ वाक्य साधे, विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी, नकारार्थी यापैकी असू शकते.

उदा. आम्ही जातो आमच्या गावाला
कर्ता क्रियापद
तानाजी लढता लढता धारातीर्थ पडले

(b) संयुक्त वाक्य :

दोन किंवा अधिक केवल वाक्य प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता जे एक जोडवाक्य तयार होते त्यास संयुक्त वाक्य म्हणतात

उदा. मी रोज पहाटे उठतो व तास भर अभ्यास करतो.
सायंकाळी मी क्रिडांगणावर खेळतो किंवा फिरायला जातो.

(c) मिश्र वाक्य

एक प्रधान वाक्य व एक किंवा अनेक गौण वाक्य गौणत्वसुचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे एक संमिश्र वाक्य तयार होते. त्याला मिश्र वाक्य असे म्हणतात.

उदा. जे चकाकते ते सोने नसते — पहिले वाक्य गौण, दुसरे वाक्य प्रधान
गुरुजी म्हणाले की प्रत्येकाने शाळेत यावे
आकाशात जेव्हा ढग जमतात तेव्हा मोर नाचू लागतो

टिप. जोडीच्या अव्ययांनी दोन वाक्य एकत्र केल्यास ते मिश्र वाक्य असते. म्हणजे जो-तो, जर-तर, जेव्हा-तेव्हा, जेथे-तेथे, असे-तसे हे शब्द ज्या वाक्यात असतात ते मिश्र वाक्य असते.

+ मिश्रवाक्यातील गौणवाक्याचे तीन प्रकार पडतात

1. नामवाक्य
2. विशेषणवाक्य
3. क्रियाविशेषण वाक्य

1. नामवाक्य

मिश्र वाक्यातील गौण वाक्य नामाचे कार्य करीत असल्यास त्याला नामवाक्य असे म्हणतात.

उदा. गुरुजी म्हणाले (प्रधान) की पृथ्वी गोल आहे (गौण).

वरील वाक्यात पृथ्वी गोल आहे हे गौणवाक्य नामाचे कार्य करते म्हणून नामाच्या कार्य करणाऱ्या वाक्याला नाम वाक्य म्हणतात.

② विशेषण वाक्य

जे गौण वाक्य मिश्र वाक्यात विशेषणाचे कार्य करते त्यास विशेषण वाक्य असे म्हणतात.

उदा. जे चकाकते ते सोने नसते
(गौण) (प्रधान)

वरील वाक्यात जे चकाकते हे गौण विशेषण वाक्य आहे.

③ क्रियाविशेषण वाक्य

जे गौण वाक्य प्रधान वाक्यातील क्रियापद किंवा क्रियाविशेषण यांबद्दल विशेष माहिती सांगते म्हणजे त्या बाबतीत काळ, स्थळ, रीत, कारण, संकेत इ विषयी अधिक भर घालते त्यास क्रियाविशेषण वाक्य म्हणतात.

उदा. जेव्हा विजा चमकू लागल्या तेव्हा पाऊस आला
(गौण) (प्रधान)

वरील वाक्यातील जेव्हा विजा चमकू लागल्या हे गौण वाक्य दुसऱ्या प्रधान वाक्याबद्दल काळाच्या बाबतीत माहिती सांगते म्हणून या वाक्यास गौण क्रियाविशेषण वाक्य असे म्हणतात.

तुला जसे वाटते तसे वाग

जरी ती चाळीशीत तरी ती सुंदर दिसते.
(विरोधदर्शक क्रियाविशेषण गौण वाक्य)

शरीर चांगले रहावे म्हणून आम्ही व्यायाम करतो
(उद्देशदर्शक क्रियाविशेषण अव्यय)

तो इतक्या मोठ्याने बोलला की त्याचा आवाज बसला

जर उद्या सुट्टी मिळेल तर मी गावाला जाईल

③ वाक्य संकलन / वाक्य संयोजन / वाक्य संश्लेषण / वाक्य एकीकरण

एक मेकांशी संबंध असणारी 2 किंवा अधिक केवल वाक्य दिले असता ते एकत्र करून त्यांचे एकच वाक्य बनविणे त्याला वाक्य संकलन असे म्हणतात.

उदा. सकाळी 8 वाजण्याचा सुमार असावा
मी बाहेर जाण्याच्या तयार होतो
इतक्यात मला एक तार आली
तारेत लिहिले होते
ताबडतोब मुंबईस निघून या.

सकाळी 8 वाजण्याच्या सुमारास मी बाहेर जाण्याच्या तयारीत असताना मुंबईस निघून येण्यास बद्दल मला एक तार आली

तो फारशीवरून चालत होता
त्याचा पाय घसरला
तो पडला

फरशीवरून चालत असताना पाय घसरून तो पडला.

वाक्यसंकलनाचे प्रकार (3)

- दोन किंवा अधिक केवलवाक्याचे एक केवलवाक्य (च, ऊन, मुळे, वर) बनवणे
- दोन किंवा अधिक केवलवाक्याचे एक संयुक्त वाक्य (प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यय) बनवणे
- दोन किंवा अधिक केवलवाक्याचे एक मिश्र वाक्य (गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यय) बनवणे

① दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे एक केवलवाक्य बनविणे
केवल वाक्यात एकच क्रियापद कायम ठेवून इतर क्रियावाचक शब्दांना च, ऊन, मुळे, वर, ताना इ. प्रत्यय लावून त्यांची धातूसाधिते, नामे, विशेषणे, क्रियाविशेषणे आपल्याला बनवावी लागतात

उदा मी चहा पितो. माझ्या वडिलांना ते आवडत नाही.
माझे चहा पीणे माझ्या वडिलांना आवडत नाही.

आरती सुरु झाली
घंटानाद सुरु झाला.

आरती सुरु झाल्यावर घंटानाद सुरु झाला.

② दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे एक संयुक्त वाक्य बनविणे
वरील प्रमाणे वाक्य बनविताना प्रधानत्वसुचक उभयान्वयी अव्यय वापरावे

उदा. विजा चमकु लागल्या.
पावसाला सुरवात झाली.

विजा चमकु लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.

आपण मरावयास डरकत नाही
आपण किर्तीरुपाने उरावे.

मरावे परी किर्तीरुपी उरावे

③ दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे मिश्र वाक्य बनविणे.
गौणत्वसुचक उभयान्वयी अव्यय व जोडीची अव्यय ज्या वाक्यात येतात त्यांना मिश्र वाक्य म्हणतात.

उदा गुरुजी म्हणाले
पृथ्वी सुर्याभोवती फिरते.

गुरुजी म्हणाले की पृथ्वी सुर्याभोवती फिरते

उदया सुट्टी मिळेल.
मी तुमच्या घरी येईन

तर उदया सुट्टी मिळाली तर मी तुमच्या घरी येईन

④ वाक्यपरिवर्तन

वाक्यार्थाला बाधा न आणता वाक्याच्या रचनेत केलेला बदल म्हणजे वाक्य रूपांतर किंवा वाक्यपरिवर्तन होय.

उदा. तो घरी खात्रीने येईल
तो घरी आल्याशिवाय राहणार नाही

+ वाक्यपरिवर्तनाचे प्रकार (मुख्य - ४)
- प्रश्नार्थीवाक्य व विधानार्थीवाक्याचे यांचे परस्पर रूपांतर
- उद्गारार्थी व विधानार्थी वाक्याचे परस्पर रूपांतर
- होकारार्थीवाक्य व नकारार्थीवाक्याचे परस्पर रूपांतर
- केवलवाक्य संयुक्तवाक्य आणि मिश्रवाक्य यांचे परस्पर रूपांतर

① प्रश्नार्थीवाक्य व विधानार्थीवाक्याचे परस्पर रूपांतर

+ प्रश्नार्थीवाक्य होकारदर्शक असल्यास त्याचे विधानार्थी वाक्य नकारदर्शक करतात

+ नकारार्थीवाक्य होकारदर्शक असल्यास त्याचे प्रश्नार्थीवाक्य होकारदर्शक करावे.

उदा. जगी सर्वसुखी असा कोण आहे? (प्रश्नार्थी होकारदर्शक)
जगात सर्वसुखी असा कोणी नाही. (विधानार्थी नकारदर्शक)

अपमान केल्यास कोणाला राग येत नाही (प्रश्नार्थी नकारदर्शक)
अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतोच (विधानार्थी होकारदर्शक)

② उद्गारार्थी व विधानार्थी वाक्याचे परस्पर रूपांतर

उद्गारार्थी वाक्याचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करताना मूळच्या वाक्यातील भाववाचक शब्द वगळावा लागतो व वाक्याचा अर्थ कायम ठेवण्यासाठी उतर शब्द वापरावे लागतात तसेच पुढील प्रकारच्या शब्दाच्या जागी दुसरे शब्द घेऊन वाक्य विधानार्थी करावे लागते

+ काय - फार
+ किती - अत्यंत
+ कोण - अतोनात
+ केवढी - खूप

उदा - काय वेगात पळाला तो शर्यतीत! (उद्गारार्थी)
तो शर्यतीत फार वेगात पळाला (विधानार्थी)
आज जत्रेत कोण गरदी!
आज जत्रेत अतोनात गर्दी होती.
मी IAS झालो तर!
मला IAS होण्याची फार इच्छा आहे.
मला लॉटरीत 1 लाख ₹ मिळाले तर!
मला लॉटरीत 1 लाख ₹ मिळावे अशी तिव्र इच्छा आहे.

③ होकारार्थी वाक्याचे नकारार्थी वाक्यात परस्पर रूपांतर

+ होकारार्थी वाक्याचे नकारार्थी वाक्यात रूपांत्तर करताना विरूद्धार्थी शब्द वापरावे लागते.
+ विरूद्धार्थी शब्द वापरण्याचे दोन प्रकार

① नकार दर्शक उपसर्ग
अ, अन, न, ना नि, बे, बिन, विना, गैर, शिवाय

मंगल - अमंगल
आदर - अनादर
लायक - नालायक
वापर - गैरवापर
सायास - विनासायास
तक्रार - विनतक्रार

(b) विरुद्धार्थी शब्द वापरून

श्रीमंत - गरीब
जलद - सावकाश
सुरुवात - शेवट
स्वीकारणे - नाकारणे
जेष्ठ - कनीष्ठ
नफा - तोटा
बरा - वाईट

उदा. ही कल्पना बऱ्यापैकी आहे. (होकारार्थी)
ही काही वाईट कल्पना नाही. (नकारार्थी)

(2) 500 ₹ देखील मोठी रक्कम आहे (हो)
500 ₹ ही काही लहान रक्कम नव्हे (न)

(3) हे आम्हाला सुईचे नाही (न)
हे आम्हाला गैरसोईचे आहे (हो)

(4) तो कोठे न थांबता बोलला (न)
तो अस्खलित बोलला (हो)

(5) त्याला तेथे थांबवा (हो)
त्याला पुढे जाऊ देऊ नका (न)

(6) त्याचा अर्ज फेटाळण्यात आला (हो)
त्याचा अर्ज स्वीकारण्यात आला नाही (न)

(7) धुम्रपान टाळावे (हो)
धुम्रपान करू नये (न)

(c) केवल वाक्य संयुक्त वाक्य मिश्र वाक्य यांचे रूपांतर

उदा मला ताप आला आहे मी शाळेस जाणार नाही - वाक्य
मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही - केवल वाक्य
मला ताप आला म्हणून मी शाळेस जाणार नाही - संयुक्त वाक्य
मी शाळेला जाणार नाही कारण मला ताप आला आहे - मिश्र वाक्य

# ③ वृत्त

+ अभ्यासक्रमातील घटक

① वृत्त म्हणजे काय ?

② वृत्ताचे प्रकार

(i) अक्षरगणवृत्त (15)

(ii) मात्रावृत्त (16)

(iii) छंदवृत्त (2)

③ अनुष्टुभ

① वृत्त म्हणजे काय ?

भाषेमध्ये विचार व्यक्त करण्याच्या दोन पद्धती आहेत.

(i) गद्य

(ii) पद्य

(i) गद्य :-

आपल्या मनात जसे विचार येतात तसे सहजरित्या बोलून दाखवणे या स्वाभाविक बोलण्याला गद्य असे म्हणतात

उदा. पंढरीची दिंडी चालली पहा.

(ii) पद्य :-

लयबद्ध शब्द रचनेला पद्य असे म्हणतात

उदा : पहा दिंडी चालली पंढरीला.

+ वृत्ते :-

पद्यात जी विशिष्ट प्रकारची काव्य रचना केली जाते त्याला वृत्ते असे म्हणतात.

अक्षरसंख्या, मात्रासंख्या, अक्षरांचा दीर्घ उच्चार इ. बंधने पाळून केलेले लेखन म्हणजे वृत्त होय.

उदा जोडोनिया धन, उत्तम व्यव्हारे
उदास विचारे, वेच करी

+ वृत्ताचे प्रकार

वृत्ताचे 3 प्रकार पडतात ते पुढीलप्रमाणे :-

(i) अक्षरगणवृत्त

उपघटक - (5)

(i) लघुगुरु अक्षरे
(ii) गण
(iii) यती
(iv) अक्षरगणवृत्त म्हणजे काय ?
(v) अक्षरगणवृत्ताचे प्रकार (15)

(i) लघुगुरु अक्षरे :-

सामान्य भाषेत ज्यांना र्‍हस्व दीर्घ म्हणतात त्यांना पदयाच्या भाषेत लघुगुरु असे म्हणतात

लघुगुरु अक्षरांची माहिती पुढीलप्रमाणे :-

(a) लघु अक्षर :-

अ, इ, उ, ऋ या र्‍हस्व उच्चारल्या जाणाऱ्या स्वरास किंवा क, कि, कु, कृ यासारख्या स्वरयुक्त अक्षरास लघुअक्षरे असे म्हणतात.

लघु अक्षर अर्धचंद्राकृतीने ( ∪ ) दाखवितात.

उदा - नयना
∪ ∪ –

(b) गुरु अक्षर :-

आ, ई, ऊ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः तसेच का, की, कू, के, कै, को, कौ, कं, कः ही अक्षरे यांना गुरु म्हणतात.

गुरु अक्षर छोट्या आडव्या रेषेने दाखवतात

उदा.

+ लगाक्रम

ल म्हणजे लघु आणि ग म्हणजे गुरु यांच्या क्रमाला लगाक्रम असे म्हणतात

+ लघु गुरु अक्षर ओळखण्याचे नियम

① जोडाक्षराच्या पुर्वीच्या लघु अक्षरावर आघात किंवा जोर दिल्यास ते लघु अक्षर गुरु मानावे. आघात होत नसल्यास लघु अक्षर लघु मानावे

उदा. पुस्तक , उन्हात
— U U , U — U

② लघु अक्षरावर अनुस्वार किंवा विसर्ग येत असेल तर ते अक्षर गुरु मानावे.

उदा. अंगण , दु:ख
— U U , — U

③ जोडाक्षरातील शेवटचा वर्ण (स्वर) ऱ्हस्व असेल ते जोडाक्षर ऱ्हस्व मानावे परंतु जोडाक्षरातील शेवटचा वर्ण दीर्घ असेल तर गुरु मानावे.

उदा. भास्कर , इच्छा
— U U , U —

④ कवितेतील चरणाच्या शेवटी येणारे लघु अक्षर दीर्घ उच्चारले जाते म्हणून ते गुरु मानावे.

उदा - पक्षाला बघ घाली भुवरी पारिजात
— U — —

(ii) गण

गण म्हणजे कवितेतील अक्षरे मोजण्याचे माप होय कवितेच्या चरणातील तीन अक्षरांचा एक गट करून त्या खालील लघु गुरुची चिन्हे मांडून शेवटी त्याखाली काही अक्षरे लिहतात यालाच व्याकरणात गण असे म्हणतात.

+ लघु गुरु क्रमाने गणाचे 8 प्रकार पडतात.

य. र. ल. त. भ. ज. स. म

| अ.क्र. | अक्षर | चिन्ह | गण | लघुगुरुची स्थिती |
|---|---|---|---|---|
| 1 | आरंभीचे अक्षर लघु | U - - | य यमाचा | आद्य लघु |
| 2 | मधले अक्षर लघु | - U - | र राधिका | मध्य लघु |
| 3 | शेवटचे अक्षर लघु | - - U | त - ताराप | अंत्य लघु |
| 4 | प्रत्येक अक्षर लघु | U U U | न - नमन | सर्व लघु |
| 5 | आरंभीचे अक्षर गुरु | - U U | भ भास्कर | आद्य गुरु |
| 6 | मधले अक्षर गुरु | U - U | ज - जनास | मध्य गुरु |
| 7 | शेवटचे अक्षर गुरु | U U - | स - समरा | अंत्य गुरु |
| 8 | प्रत्येक अक्षर गुरु | - - - | म - मानवा | सर्व गुरु |

(iii) यती

कवितेचे चरण म्हणत असताना आपण मध्येच काही अक्षरानंतर नैसर्गिक रीत्या थांबतो या थांबण्याच्या जागेला किंवा विरामाला यती असे म्हणतात

उदा. मना सज्जना क कडेनेच जावे

या काव्यपंक्तितील क या अक्षरावर यती आलेली आहे

→ यतीभंग

यतीच्या जागी शब्द पूर्ण व्हावा तो शक्यतो तोडला जाऊ नये यतीमुळे शब्द तोडला जात असेल तर त्या ठिकाणी यतिभंग दोष झाला असे मानले जाते

उदा. प्रिय आमुचा एक महा राष्ट्र देश हा

(iv) अक्षरगणवृत्त म्हणजे काय ?

ज्या वृत्तामध्ये अक्षरसंख्या ठराविक असून त्या अक्षरातील लघुगुरु क्रमही ठराविक (सारख्याच) असण्याचे बंधन ज्या पदयावर असते त्याला अक्षरगणवृत्त असे म्हणतात

उदा - सदा सर्वदा योग तुझा घडावा
तुझे कारणी देह माझा पडावा
उपेक्षू नको गुणवंता अनंता
रघुना | यकामा | गणेहे | चिआता
U - - | U - - | U - - | U - -

वरील 4 ओळीमध्ये प्रत्येकात 12 अक्षरे व त्यांचा लघुगुरु क्रम तसेच गण सारख्याच आहे म्हणून याला अक्षरगणवृत्त असे म्हणतात

(v) अक्षरगणवृत्ताचे प्रकार (15)

| अनु.क्र. | अक्षरगणवृत्ताचे प्रकार | चरणातील अक्षर | गण | यती |
|---|---|---|---|---|
| 1 | इंद्रवज्रा | 11 | त त ज ग ग | 5 व्या अक्षरावर |
| 2 | उपेंद्रवज्रा | 11 | ज त ज ग ग | 5 व्या अक्षरावर |
| 3 | उपजाती | 11 | माणि - त त ज ग ग<br>ज त ज ग ग | 5 व्या अक्षरावर |
| (4) | भुजंगप्रयात | 12 | य य य य | 6 व्या अक्षरावर |
| (5) | द्रुतविलंबित | 12 | न भ भ र | चरणाच्या शेवटी |